८) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आधो-४०१२/प्र.क्र.३५/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

९) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अद्यावत असावे, तसेच ते सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व **अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक आहे.

१०) सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरिता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल

११) अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र.४७/ मावक-५, दिनांक २६ मार्च, २०१० अन्वये कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतीचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल आणि उमेदवार नियुक्तीस पात्र झाला असेल, अशा उमेदवारांने त्याच्या जाती दाव्या प्रित्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आत कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाकडे करावी. कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर तात्काळ जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील. संबंधित उमेदवाराच्या जातीचा दावा वैध असल्याबाबतचा समितीचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येतील. जात पडताळणी समितीकडून ३ महिन्याचे आत जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त होणे अपेक्षित आहे. ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीस पात्र नाही, असे समजण्यात येईल.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे विहित नमुन्यातील जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. ज्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल असा उमेदवार नियुक्तीस पात्र राहणार नाही. (शासन परिपत्रक:- सीबीसी-**१०/२०१०**/प्र.क्र.**४७**/मावक-**५**, दिनांक **२६** मार्च **२०१०**)

१३) सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

१४) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत आहेत किंवा नाही, याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

१५) शासन निर्णय क्रमांक आरटीए १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ,दिनांक०२/०९/१९८३ अन्वये युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहिल.

**निवड पध्दत** :-

१) परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस.एम.एस. (**SMS**) व्दारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्दीस देऊन माहिती कळविण्यात येईल. त्यामुळे अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी वेळोवेळी संकेत स्थळास भेट देणे आवश्यक राहील.

२) पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही.

३) वरील सर्व पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. मात्र निवडसूचीतील उमेदवारांची व त्या उमेदवाराने सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता पडताळणीसाठी (**Document Verification**) समक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

४) उमेदवारांची निवड निव्वळ गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान **५०%** व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान **४५%** गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

५) परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या सामान्यीकरण (**Normalization**) गुणांची यादी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६) उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे. ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नाबरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल.

७) पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. तसेच ई-मेलवर अथवा मोबाईलवर मेसेजद्वारे कळविण्यात येईल.

**निवडसूची ही प्रवर्ग निहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या पुढीलप्रमाणे असेल.**

| प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १ | ३ |
| २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते |
| ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते |
| १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते |
| ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के |

वरीलप्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील पूर्णांक संख्या विचारात घेण्यात येईल.

८) कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इ. बाबतची सर्व मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) प्रमाणपत्र तपासणीकरीता येतेवेळी अर्जासोबत जोडलेल्या दस्तऐवजांच्या मूळ प्रती व त्याचे २ स्वसाक्षांकीत (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा व स्वत:चे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकीत (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१०) पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर SMS किंवा E-mail द्वारे निवडसूची / प्रतिक्षा यादी व नियुक्तीबाबत कळविण्यात येईल. तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

११) कृपया नोंद घ्या की, नोंदणी प्रक्रियेनंतर, प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाते. लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवारांना ईमेल / SMS द्वारे त्याबद्दल सूचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरून त्याचे प्रवेशपत्र डाउनलोड करू शकतात. प्रवेशपत्राबाबत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :--**

१. अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

ब) समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु.क्र. (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त करीत असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) वरील अनु.क्र. (अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

ड) वरील अनु.क्र. (अ),(ब) व (क) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

२. सेवा प्रवेश नियम / जाहिरात / अधिसुचनेमध्ये अनुभव विहित केल्याप्रमाणे, अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

३. वरील निकष लावूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

**टीप :** आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वनविभाग, क्र.एससीवाय १२०५/प्र.क्र.१८९/ म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास, शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगा/मुलगी) होय.

**सर्वसाधारण अटी / शर्ती / सूचना :--**

१. उमेदवार हा भारताचा नागरिक असावा, आणि महाराष्ट्रात १५ वर्षे अधिवास (Domicile) करीत असल्याबाबतचे त्याने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे कार्यालयाकडील) किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तसाच अर्थ असेल.

२. शैक्षणिक अर्हते व्यतिरिक्त सर्व पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना नेमणूकीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल, असे संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान (महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र इत्यादी), एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल. (महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग निर्णय क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.४ फेब्रुवारी, २०१३ व समान क्रमांकाचे शासन परिपत्रक दि.८ जानेवारी, २०१८) व त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. टंकलेखन प्रमाणपत्राची आवश्यकता असलेल्या पदांकरीता, उमेदवारांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टंकलेखनाचे ४० शब्द प्रति मिनिट वेग मर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. इतर कोणतेही प्रमाणपत्र अनुज्ञेय असणार नाही.

४. निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिका सेवा प्रवेश नियमावली २०२१, महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतूदी लागू होतील.

५. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृत्ती योजना / राष्ट्रीय निवृत्ती योजना (DCPS/NPS) लागू राहील.

६. शासन निर्णय क्र. संकिर्ण/२००७/पडताळणी/नवि-२६, दि.२१/११/२००७ अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याची/तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

७. महाराष्ट्र नागरी सेवा, लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र नियम, २००५ (महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एम.आर.व्ही.-२०००/ २०१२, दि.१/७/२००५) अन्वये उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

८. उपरोक्त पदांवर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीनंतर उमेदवाराची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडून वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

९. उमेदवारांस मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यास मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे आवश्यक आहे.

१०. माजी सैनिक उमेदवाराने, राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील येणाऱ्या कार्यालयांकडे विहित पदांसाठी अर्ज केले असतील तर त्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२०१४/(प्र.क्र.३६४/१४)/२८, दि.३ जून, २०१६ मधील तरतूदी लागू राहतील.

११. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारची विनंती / अर्ज स्विकारले जाणार नाही अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

१२. नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवाराने विहीत केलेली इतर बंधपत्र / प्रतिज्ञापत्र / वचनपत्र / करारपत्र इ. विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महानगरपालिका सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाही.

१३. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१४. उपरोक्त पदांकरीता नियुक्ती देण्यात येणाऱ्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणूकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. तसेच अशा उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करुन परिविक्षाधीन कालावधी ६ महिने वाढविण्यात येईल. तदनंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर अधिकारी / कर्मचारी यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१५. भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित किंवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

१६. निवड झालेल्या उमेदवारास महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या पदांना निवास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे अशा पदावर नियुक्ती झाल्यास व भविष्यात त्यांना निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास त्यांना दरमहा निवास भाडे अनुज्ञेय राहणार नाही.

१७. उमेदवाराने या भरती प्रक्रिये संदर्भातील माहिती व सूचना कल्याण डोंबिवली महानगरपालिका संकेत स्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत www.kdmc.gov.in वरील संकेतस्थळावर उमेदवारांनी सद्य:स्थिती (updates) वेळोवेळी पहावी.

१८. उपरोक्त पदाकरीता शासनाकडील किंवा खाजगी कंपनीकडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा.निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवारांची, निवड / नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१९. उमेदवारांनी परिविक्षाधीन कालावधीमध्ये अथवा वाढीव परिविक्षाधीन कालावधीमध्ये कामाचा अपेक्षित दर्जा न प्राप्त केल्यास आणि किंवा विहित विभागीय परीक्षा, परिविक्षाधीन कालावधीमध्ये उत्तीर्ण न केल्यास आणि अशा तऱ्हेने त्यांचे काम योग्य अथवा अनुरुप न आढळल्यास ते सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

२०. या जाहिरातीव्दारे सरळ सेवेने करण्यात येणाऱ्या नियुक्त्या तात्पुरत्या / अस्थायी स्वरुपाच्या असतील व त्यासंबंधी पदांच्या सेवा प्रवेश नियमावलीतील अटी व शर्ती व अन्य बाबींची पूर्तता केल्यानंतर नियमित करण्यात येतील.

२१. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितांवर बंधनकारक असतील.

२२. परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवासखर्च देय नाही.

२३. नियुक्तीकरीता निवड झालेले उमेदवार हे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत कोठेही किंवा कल्याण डोंबिवली महापालिकेच्या हद्दीच्या बाहेर कल्याण डोंबिवली महापालिकेचे कार्यालय जेथे असेल तेथे किंवा कल्याण डोंबिवली महानगरपालिका भविष्यकाळात कार्यालय सुरु करु शकेल, तेथे पदस्थापना केले जाण्यास पात्र ठरतील.

२४. सरळसेवेने नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने वेळोवेळी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

२५. अग्निशमन सेवेतील सर्व पदांकरीता ऑनलाईन परीक्षेकरीता १०० गुण व मैदानी क्षमता चाचणी परीक्षेकरीता १०० गुण अशी एकूण २०० गुणांची परीक्षा असेल, तसेच इतर सर्व पदांकरीता २०० गुणांची ऑनलाईन परीक्षा असेल. (मैदानी चाचणीचे परिशिष्ट-अ सोबत जोडले आहे.)

२६. अग्निशमन सेवेतील पदांकरीता अर्जात नमूद करण्यात आलेली शारिरीक पात्रता मैदानी चाचणीच्या वेळी तपासण्यात येईल. पदास आवश्यक असलेली किमान पात्रता प्राप्त न केल्यास उमेदवाराची उमेदवारी / निवड रद्द करण्यात येईल.

२७. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज करतेवेळी अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२८. ऑनलाईन अर्ज स्विकारताना कागदपत्रांची सत्यता पडताळणी होणार नाही. निवड होणाऱ्या उमेदवारांकडून सादर होणारी माहिती, कागदपत्रे इत्यादी सर्वच बाबींची सत्यता पडताळणी होणार आहे. त्यामुळे निवड होणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीपूर्वी सादर केलेली माहिती चुकीची असल्याचे अथवा कागदपत्रे बोगस/खोटी असल्याचे आढळुन आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येवून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा आशयाचा उल्लेख असल्याचे बंधपत्र स्टॅम्प पेपरवर कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**खेळाडू आरक्षण :--**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दि.३० जुन, २०२२ तसेच शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्र.खेआक्ष-२९२३/प्र.क्र.५७/का-१३, दि.७ जुन २०२३ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात, तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३. खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४. कागदपत्रे पडताळणी वेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

५. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उप संचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**पात्र क्रीडा स्पर्धा**

| क्रीडा विषयक अर्हता | खेळ विषयक पात्रता | |
|---|---|---|
| | **वैयक्तिक स्पर्धा** | **सांघिक स्पर्धा** |
| **गट- क साठी पात्र क्रीडा स्पर्धा**<br>गट-अ व गट-ब या पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा<br>१. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट<br>I) राष्ट्रीय ज्यूनिअर गट अजिंक्यपद स्पर्धा<br>२. राज्यस्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा<br>I) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा<br>३. राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा<br>४. राज्यस्तर ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>५. राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)<br>६. राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा<br>७. राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा<br>८. राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा<br>(टिप- अ.क्र.१ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५% आरक्षणासाठी पात्र राहतील.) | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर संबंधित विभाग / जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर संबंधित विभाग / जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून संघाने प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |

**दिव्यांग आरक्षण :--**

१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/ प्र.क्र.११४/१६ अ, दि.२९ मे, २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील, भरती करावयाच्या एकूण पदांच्या टक्केवारीवर दिव्यांग आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

| पदनाम | कर्तव्य / जबाबदारी | अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| औषध निर्माता (Pharmacist) | महानगरपालिकेच्या रूग्णालयातील रूग्णांच्या उपचाराशी संबंधित कामकाज पाहणे. | S, ST, W, BN, MF, RW, SE | (a) Nil,<br>(b) D, HH<br>(c) OA, OL, BL, OAL,SD,SI, LC, Dw, AAV<br>(d) ID, SLD, MI<br>(e) MD involving (a) to (c) above |
| स्टाफ नर्स (Staff Nurse) | महानगरपालिकेच्या वैद्यकीय सहाय्यकारी व इतर संबंधित कामे, आरोग्य मोहिमा राबविणे, महानगरपालिकेच्या कार्य नियमावलीनुसार कामे करणे. | S, ST, W, MF, RW, SE, H, C | (a) LV,<br>(b) Nil,<br>(c) OL, CP,SD,SI, LC, Dw, AAV<br>(d) SLD, MI<br>(e) MD involving (a) to (c) above |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) Junior Engineer (Civil) | महापालिकेतील स्थापत्य विषयक कामे करणे, कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाचे बांधकाम संकल्प चित्रानुसार होत आहे आहे किंवा नाही याचे देखरेख व नियंत्रण, कामांचा दर्जा तपासणे, महानगरपालिकेच्या कार्य नियमावलीनुसार कामे करणे. | S, ST, W, BN, MF, RW, SE, H, C | (a) LV,<br>(b) D, HH,<br>(c) OA, BA, OL, SD,SI,BL, Dw, AAV<br>(d) SLD, MI<br>(e) MD involving (a) to (d) above |
| कनिष्ठ अभियंता (विद्युत) Junior Engineer (Electrical) | महानगरपालिकेतील विद्युत विभागाकडील कामे करणे. | S, ST, W, BN, KC, PP, MF, RW, SE, C | (a) Nil,<br>(b) D, HH,<br>(c) OL,SD,SI, LC, Dw, AAV<br>(d) SLD, MI<br>(e) MD involving (a) to (c) above |
| कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) Junior Engineer (Mech.) | महानगरपालिकेतील यांत्रिकी विभागाकडील कामे करणे | S, ST, W, BN, KC, MF, RW, SE, H, C | (a) LV,<br>(b) D, HH,<br>(c) OA, BA, OL, LC, SD,SI,Dw, AAV<br>(d) ASD(M), SLD, MI<br>(e) MD involving (a) to (d) above |
| लिपिक टंकलेखक (Clerk Typist) | महानगरपालिका निहाय लिपिक संवर्गाची सर्व कर्तव्ये पार पाडणे, महानगरपालिकेच्या कार्य नियमावली नुसार कामे करणे. | S, ST, W, BN, RW, SE, H, C, MF | (a) B, LV<br>(b) D, HH<br>(c) OA, BA, OL, BL, OAL, SD, SI, CP, LC, DW, AAV, Mdy<br>(d) ASD (M,MOD), ID, SLD, MI<br>(e) MD involving (a) to (b) above |
| लेखा लिपिक (Account | महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या विविध रक्कमांचे कोषागारात भरणा करणे, डे-बुक / | S, W, MF, RW, SE, H, C | (a) LV<br>(b) HH |

| | | | |
|---|---|---|---|
| Clerk) | कॅश बुक अद्यावत ठेवणे,रोखपालांची दैनंदिन कामे करणे, महानगरपालिकेच्या कार्य नियमावलीनुसार कामे करणे. | | (c) OA, OL, BL, SD,SI,CP, LC, DW, AAV<br>(d) ASD (M), SLD, MI<br>(e) MD involving (a) to (d) above |

**FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED :**

S=Sitting, ST=Standing, W=Walking, BN=Bending, L=Lifting, MF= Manipulation with Fingers, RW=Reading & Writing, SE=Seeing, H=Hearing, C=Communication.

**CATEGORY ABBREVIATIONS USED :**

B=Blind, LV=Low Vision, D=Deaf, HH=Hard of Hearing,OA=One Arm, OL=One Leg, BA=Both Arms,BL=Both Leg, OAL=One Arm and One Leg, BLOA=Both leg & one arm, BLA=Both Legs Arms,SpinalDeformity (SD) and Spinal Injury (SI), CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, MDy=Muscular Dystrophy, ASD=AutismSpectrum Disorder (M=Mild, MoD=Moderate), ID=Intellectual Disability, SLD=Specific Learning Disability, MI=Mental Illness,MD=Multiple Disabilities

३. दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४. दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

५. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येच्या ४% असतील.

६. संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

७. लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील :-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती लागू राहतील.

(२)दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती लागू राहतील.

८. लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीव्दारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

९. लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेल्या दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

## लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी (Locomotor Disability and cerebral palsy)

लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रलपाल्सी बाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यंत किमान (४०% दिव्यांग) असेल अशा उमेदवारांसाठी परिक्षेच्या प्रती तास २० मिनिटे अधिक वेळ अनुज्ञेय असेल.

## मदतनीस वापरणा-या दिव्यांग उमेदवारासाठी सूचना :--

दृष्टीहीन उमेदवार आणि उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायम स्वरुपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाईन परिक्षेदरम्यान त्यांच्या स्वत:च्या मदतनीसाचा, खाली दिलेल्या मर्यादेच्या अधीन राहून वापर करु शकतात.उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी मदतनीसाच्या मदती विषयी नोंदणी केली आहे व ज्यांना परीक्षेच्या दिवशी मदतनीसाची मदत घेणेस अनुमती देण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ देला जाईल. तथापि अशा उमेदवाराने परीक्षेच्या वेळी किमान ४०% अपंगत्व असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

१. परीक्षेपुर्वी ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवाराला त्याच्या / तिच्या स्वखर्चाने स्वत:च्या मदतनीसाची व्यवस्था करावी लागेल.

२. मदतनीस कोणत्याही शैक्षणिक प्रवाहातील असू शकतो. तथापि, विशेष तज्ञ अधिकाऱ्यांच्या पदांसाठी मदतनीस हा त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक प्रवाहातील नसावा. तसेच सदर मदतनीसाची शैक्षणिक पात्रता ही उमेदवाराच्या पदाच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या कमीत कमी, एक स्तर कमी असावी.

३. उमदेवाराने नेमलेला मदतनीस हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि मदतनीस या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत मदतनीसाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी काळजीपूर्वक अर्ज करताना सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही.

४. एका उमेदवारासाठी मदतनीस म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस दुसऱ्या उमेदवारासाठी मदतनीस म्हणून काम करता येणार नाही.

५. उमेदवार आणि मदतनीस या दोघांनाही उचित हमीपत्र द्यावे लागेल की, मदतनीसाने वर नमूद केलेल्या मदतनीसासाठी सर्व विहित पात्रता निकषांची पूर्तता केली आहे. पुढे जर नंतर असे आढळून आले की, त्याने / तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत, तर सदर उमेदवाराची उत्तर पत्रिका विचारात घेतली जाणार नाही व त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.

६. जे उमेदवार मदतनीसाचा वापर करतात त्यांना परिक्षेच्या विहीत वेळेच्या प्रत्येक तासाला **२०** मिनिटे अधिक वेळ अनुज्ञेय राहील.

७. मदतनीसाने स्वत:हून उत्तर देऊ नये. असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारास परिक्षा देणेपासून रोखले जाईल व त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.

८. फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल. जर त्यांनी / तिने त्यासाठी नोंदणी अर्ज केला नसेल तर चाचणी आयोजित करणाऱ्या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही. सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी अर्ज न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

९. परिक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, मदतनीस स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परिक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. तसेच परिक्षेनंतर लिखित प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल जर चाचणी प्रशासक कर्मचाऱ्यांकडून दिला गेला तर अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

**अनाथ आरक्षण :--**

१. अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२३ ऑगस्ट, २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

२. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

३. प्रस्तुत पदासाठी अर्जाव्दारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दि.२३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

४. अनाथ व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येच्या १% असतील.

५. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२० ऑगस्ट, २०१९ अन्वये, अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल.

६. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.६ एप्रिल, २०२३ अन्वये, अनाथ प्रवर्गासाठी उपलब्ध जागा संस्थात्मक व संस्थाबाहय प्रवर्गास विभागून देण्यात येतील.

**विशेष सूचना :--**

१. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे ही महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील.

२. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३. मध्यस्थ / ठग / कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

४. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नाबाबतही हरकत असल्यास प्रति प्रश्न रु.१००/- इतके शुल्क आकारले जाईल.

५. वेगवेगळया सत्रांमध्ये पार पडणाऱ्या परिक्षेमधील प्रश्नपत्रिका वेगवेगळया असतील. अशा वेळी परिक्षार्थींची संख्या विचारात घेऊन परीक्षा एकापेक्षा अनेक सत्रांत पार पाडावयाची झाल्यास भिन्न प्रश्न पत्रिकांच्या काठिण्य पातळीचे

समानीकरण (Normalization) करण्यात येईल व त्यासाठी Mean Standard Deviation Method या सूत्र पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

६. **सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method)**
एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसात, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस, तसेच सत्र १ ते अंतिम सत्र याबाबत "सामान्यकरण प्रक्रिया (**Normalisation Method**) करण्यात येईल. "सामान्यीकरण प्रक्रियेचे सुत्र (**Normalisation Method Formula**) जाहीराती सोबत जोडण्यात येत आहे.

७. **Group Level Timer**
वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्रत्येक विषयातील सोपे, मध्यम व कठीण प्रश्न, गटामध्ये अंतर्भूत करुन त्यानुसार प्रत्येक गटासाठी वेळ निश्चित करुन त्याप्रमाणे परीक्षेमध्ये "ग्रुप लेवल टायमरची" अंमलबजावणी करण्यात येईल. ग्रुप लेवल टायमरबाबत सूचना परिक्षेचा दिनांक अंतिम झाल्यावर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

८. **परिक्षेचे स्वरुप :-**
जाहिरातीमधील पदांसाठी घेण्यात येणाऱ्या बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेचे स्वरुपाबाबतची माहिती व परिक्षेचा अभ्यासक्रम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे

९. परीक्षेसंबंधी / प्रतिक्षा यादी / कागदपत्रे तपासणीबाबत / नियुक्ती आदेश याबाबतची माहिती केवळ SMS / Email व्दारे कळविण्यात येईल. कोणताही पत्रव्यवहार पोस्टामार्फत / पत्त्यावर केला जाणार नाही.

**सेवा प्रवेशोत्तर शर्ती :-**

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता / परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(१) जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परिक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परिक्षा.

(२) हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधी केलेल्या निमयानुसार जर ती व्यक्ती अगोदर परिक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परिक्षा.

(३) अग्निशमन व सुरक्षा सेवेसंबंधी असणारी आवश्यक शारीरिक चाचणी उमेदवारास पात्र करावी लागेल.

(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का.२८, दि.३० मे, २०२३ अन्वये, शासन सेवेत पुर्ननियुक्त माजी सैनिक उमेदवारांना गट-क संवर्गातील ज्या पदांसाठी टंकलेखन अर्हता आवश्यक आहे अशा सर्व पदांवर नियुक्त होणाऱ्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत व २ संधीत या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि सदर मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची पुढील वेतनवाढ रोखण्यात येईल.

(५) (१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अपंग २०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दि.१६ नोव्हेंबर, २०१६ नुसार दिव्यांग उमेदवारांची, (२) महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.८/ का-०३, दि.७/७/२०२२ नुसार अनाथ उमेदवारांची, (३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दि.४/९/२०१५ नुसार प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन उमेदवारांची जाहिरातीमधील "लिपिक-टंकलेखक" पदावर नियुक्ती मिळाली तर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी व मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी देण्यात आलेला आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये सद्या "लिपिक-टंकलेखक" या पदास टंकलेखनाचे (इंग्रजी व मराठी) प्रमाणपत्र upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

(६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-परिवी-२७१४/प्र.क्र.३०२/कार्या.८, दि.२२ जून, २०२१ अन्वये, विहित कार्यपध्दतीनुसार परिवीक्षा धोरणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) मधील नियम ५३, ५४ व अनुसूची ड मधील प्रकरण ३ च्या अधिन राहून सदरची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

**दिनांक :   /   /२०२५**

**ठिकाण : कल्याण**

**( अभिनव गोयल )** भा.प्र.से.
**आयुक्त,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

# Mean Standard Deviation Method

$$\hat{M}_{ij} = \frac{\bar{M}_t^g - M_q^g}{\bar{M}_{ti} - M_{iq}} (M_{ij} - M_{iq}) + M_q^{gm}$$

Where:

$\hat{M}_{ij}$ = Normalized marks of j$^{th}$ candidate in the i$^{th}$ shift.

$\bar{M}_t^g$= is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (number of candidates will be rounded-up).

$M_q^g$= is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the examination considering all shifts.

$\bar{M}_{ti}$= is the average marks of the top 0.1% of the candidates in the i$^{th}$ shift (number of candidates will be rounded-up).

$M_{iq}$= is the sum of mean marks and standard deviation of the i$^{th}$ shift.

$M_{ij}$= is the actual marks obtained by the j$^{th}$ candidate in i$^{th}$ shift.

$M_q^{gm}$= is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

Calculation of marks will be done up to 5 decimal places.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

## परिशिष्ट-अ

## अग्निशमन सेवेतील पदांकरिता मैदानी चाचणीचे निकष व गुणांकन पध्दती

मैदानी चाचणी (पुरुषांसाठी) (१०० गुण)

(अ) १६०० मीटर धावणे (३० गुण)

| १६०० मी. अंतर पूर्ण करण्यास लागलेला कालावधी | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ५ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ३० |
| ५ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतू ५ मि. ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २७ |
| ५ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतू ५ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २४ |
| ५ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतू ६ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २१ |
| ६ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतू ६ मि. ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १८ |
| ६ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतू ६ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १५ |
| ६ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतू ७ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| ७ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतू ७ मि. ३० सेकंदापेक्षा कमी | ०५ |
| ७ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(ब) जमिनीपासून ३३ फुट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४' वरील उंचीच्या) ॲल्युमिनिसम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरणे.(आरंभ रेषेपासून शिडी २० फूट अंतरावर असेल.) (२० गुण)

| वेळ (सेकंदामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २० सेकंदापर्यंत | २० |
| २० सेकंदापेक्षा जास्त ते २५ सेकंदापर्यंत | १६ |
| २५ सेकंदापेक्षा जास्त ते ३० सेकंदापर्यंत | १२ |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३५ सेकंदापर्यंत | ०८ |
| ३५ सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | ०४ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(क) ५० कि.ग्रॅ. वजनाची मानवीय प्रतिकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे (२० गुण)

| वेळ (सेकंदामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २० सेकंदापर्यंत | २० |
| २० सेकंदापेक्षा जास्त ते २५ सेकंदापर्यंत | १६ |
| २५ सेकंदापेक्षा जास्त ते ३० सेकंदापर्यंत | १२ |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३५ सेकंदापर्यंत | ०८ |
| ३५ सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | ०४ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(ड) २० फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे. (२० गुण)

रस्सी पूर्ण चढल्यास २० गुण, ३/४(तीन चतुर्थांश) चढल्यास १० गुण, १/२ (अर्धी) चढल्यास ५ गुण तर अर्ध्यापेक्षा कमी अंतर चढल्यास शुन्य गुण दिले जातील. (रस्सीवर चढतेवेळी फक्त हाताचा वापर करणे बंधनकारक राहील. पायाचा वापर करता येणार नाही, केल्यास शून्य गुण मिळतील.)

(इ) २० पुल-अप्स (१० गुण)

प्रत्येक पूल-अपला ½ (अर्धा) गुण, याप्रमाणे २० पुल-अप्स पूर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.

मैदानी चाचणी - महिलांसाठी

(अ)८०० मीटर धावणे (१०० गुण)

(३० गुण)

| ८०० मी. अंतर पूर्ण करण्यास लागलेला कालावधी | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २ मि. ५० सेकंदापर्यंत | ३० |
| २ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि.०० सेकंदापर्यंत | २७ |
| ३ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि.१० सेकंदापर्यंत | २४ |
| ३ मि. १० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि.२० सेकंदापर्यंत | २१ |
| ३ मि. २० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि.३० सेकंदापर्यंत | १८ |
| ३ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि.४० सेकंदापर्यंत | १५ |
| ३ मि. ४० सेकंदापेक्षा जास्त ते ३ मि.५० सेकंदापर्यंत | १० |
| ३ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त ते ४ मि.०० सेकंदापर्यंत | ०५ |
| ४ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(ब) जमिनीपासून ३३ फूट उंचीवरील खिडकीस लावलेल्या ४६.४' वरील उंचीच्या) ॲल्युमिनिसम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरणे.(आरंभ रेषेपासून शिडी २० फूट अंतरावर असेल.)

(२० गुण)

| वेळ (सेकंदामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ३० सेकंदापर्यंत | २० |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | १५ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त ते ५० सेकंदापर्यंत | १० |
| ५० सेकंदापेक्षा जास्त ते ६० सेकंदापर्यंत | ०५ |
| ६० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(क) ४० कि.ग्रॅ. वजनाची मानवाकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे

(२० गुण)

| वेळ (सेकंदामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २५ सेकंदापर्यंत | २० |
| २५ सेकंदापेक्षा जास्त ते ३० सेकंदापर्यंत | १६ |
| ३० सेकंदापेक्षा जास्त ते ३५ सेकंदापर्यंत | १२ |
| ३५ सेकंदापेक्षा जास्त ते ४० सेकंदापर्यंत | ०८ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त ते ४५ सेकंदापर्यंत | ०४ |
| ४५ सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(ड) गोळा फेक (गोळयाचे वजन ४ कि.ग्रॅ.)

(१० गुण)

| गोळा फेकीचे अंतर (मीटरमध्ये ) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ६ मीटर व त्यापेक्षा जास्त | १० |
| ५.५० मीटर ते ६ मीटरपेक्षा कमी | ०८ |
| ५ मीटर ते ५.५० मीटरपेक्षा कमी | ०६ |
| ४.५० मीटर ते ५मीटरपेक्षा कमी | ०४ |
| ४ मीटर ते ४.५० मीटरपेक्षा कमी | ०२ |
| ४ मीटरपेक्षा कमी | ० |

(इ) लांब उडी

(१० गुण)

| अंतर (फुटामध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| १५ फुट व त्यापेक्षा जास्त | १० |
| १३ फुट व १५ फुटापेक्षा जास्त | ०८ |
| ११ फुट व १३ फुटापेक्षा जास्त | ०६ |
| ०९ फुट व ११ फुटापेक्षा जास्त | ०४ |
| ०९ फुटापेक्षा कमी | ० |

(फ) १० पुश अप (जोर काढणे) (१० गुण)

प्रत्येक १ पुश अपला १ गुण, याप्रमाणे १० पुश अप पूर्ण केल्यास १० गुण देण्यात येतील.